# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

आणि

महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना
(मान्यताप्राप्त)

यांच्यामधील

# इतर मागण्यांचा कामगार करार
(दि. ३० ऑक्टोबर, २००७ ते ३१ मार्च, २००८)

भारतीय गैर न्यायिक

भारत

पचास रुपये रु.50

FIFTY RUPEES Rs.50

सत्यमेव जयते

INDIA

INDIA NON JUDICIAL

General Stamp Office, Mumbai
L.S.V. No.

महाराष्ट्र MAHARASHTRA

S 314196

17 OCT 2007

Proper Officer
Shri. B. J. Khedkar

KCT

... महाराष्ट्र मंत्रालय ॲन्ड अलाईड ऑफिसर
को. ऑप. बँक लि., मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
एल. एस. व्ही. क्रमांक :-
क्रमांक :- 25 दिनांक :- ________
एसप्लेनेड न्यायालय (किल्ला कोर्ट), मुंबई
सर्वश्री/श्री./श्रीमती Om prakash Gupta
यांना न्यायेतर मुद्रांक रु ________ चा
विकला.

मुद्रांक विक्रेता
सुधीर उमाकांत पाटील

समझोत्याचे संक्षेप लेख

**औद्योगिक विवाद अधिनियम १९४७चें कलम २ (प) सहित कलम १८(१)**
**औद्योगिक विवाद**
**(मुंबई) नियम ६२ च्या अन्वये**

**उभयपक्षकारांची नावे**

| | | |
|---|---|---|
| नियोक्त्याचे (मालकाचे) प्रतिनिधी | : | श्री.ओम प्रकाश गुप्ता,<br>उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ |
| कामगारांचे प्रतिनिधी | : | श्री.हनुमंत ताटे,<br>जनरल सेक्रेटरी,<br>महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना,<br>(मान्यताप्राप्त संघटना) |

**प्रकरणाचे संक्षिप्त कथन**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (व्यवस्थापन) आणि महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना (मान्यताप्राप्त संघटना) यांच्यात दि.१६.१०.१९९९ रोजी झालेल्या कामगार कराराचा कालावधी दि.१.४.१९९६ ते ३१.३.२००० या चार आर्थिक वर्षांसाठी होता.

नवीन कामगार करारासाठी महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना यांनी त्यांचे पत्र क्र.२/२००२, दि.२ जानेवारी,२००२ नुसार मागण्यांचा मसुदा व्यवस्थापनास सादर केला.

सदर मागणी मसुदयावर संघटनेशी चर्चा करण्यासाठी महामंडळाने ठराव क्र.२०००.०९.०८, दि.१४.९.२००० अन्वये मा.अध्यक्ष,म.रा.मा.प.महामंडळ यांचे अध्यक्षते खाली वाटाघाट समिती गठीत केली. संघटनेच्या मागणी मसुदयातील मागण्यांवर वाटाघाट समितीच्या बैठकीत मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन वाटाघाट समितीने शिफारशी केल्या.

वरील मागणी मसुद्यातील एकूण ३६ आर्थिक मागण्यांवर दि.१९.१.२००५ रोजी सन २०००-२००४ व २००४-२००८ या कालावधीचे दोन कामगार करार करण्यात आले. उर्वरीत इतर मागण्यांवर महामंडळाच्या पातळीवर स्वतंत्र करार करण्याबाबत शासनाने पत्र क्र.एसटीसी/३४०४/सीआर १४२/ परि-१ दि.६.१.२००५ अन्वये खालील प्रमाणे निदेश दिलेले आहेत.

भारतीय गैर न्यायिक
भारत
पचास रुपये
रु.50
FIFTY RUPEES
Rs.50
सत्यमेव जयते
INDIA
INDIA NON JUDICIAL
महाराष्ट्र MAHARASHTRA
S 314?97
General Stamp Office, Mumbai
S. V. No. 694
17 OCT 2007
Proper Officer
Shri D. J. Khedkar
KCH



१. २००० ते २००४ आणि २००४ ते २००८ या कालावधीचे दोन (२) वेतन करार करण्यात यावेत.

२. मागिल कराराच्या प्रथेप्रमाणे वाटाघाट समितीने चर्चा करून मान्य केलेल्या इतर बाबींच्या मागण्यांचा समावेश असलेला करार महामंडळाचे पातळीवर स्वतंत्रपणे करावा. त्याचा आर्थिक भार शासनावर पडणार नसल्याने त्यास शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

३. शासनाची मान्यता फक्त रू.६० कोटी प्रत्येक वर्षात वाढ देण्यापुरतीच आहे व प्रशासकीय बाबींच्या बाबतीत शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही व ती पुर्ण करण्याची जबाबदारी शासन स्वीकारू शकत नाही असा करारात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

वाटाघाट समितीने मान्यताप्राप्त संघटनेशी त्यांच्या मागणी मसुदयावर चर्चा करून प्रशासकीय मागण्यांवर केलेल्या शिफारशी व उपरोक्त शासन पत्रातील सूचना विचारात घेऊन उभयपक्षी समझोता करण्यात आला.

-----------

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
| --- | --- | --- |
| १ | समझोत्याचा कालावधी | हा समझोता दि.३० ऑक्टोबर, २००७ ते दि.३१.३.२००८ या कालावधीसाठी राहील. |
| २ | करारात मान्य झालेल्या निर्णयाचे बाबतीत पुन्हा परिपत्रके प्रसारीत करण्यात येऊ नयेत, करारातील निर्णय अंतीम समजून अंमलबजावणी करण्यात यावी. | कामगार करारातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी परिपत्रके प्रसारीत करताना करारातील कलमांचा आशय बदलणार नाही याची खात्री करण्यात येईल व परिपत्रके प्रसारीत करण्यापुर्वी मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ३ | सुरक्षा रक्षकांची आठवडा सुट्टी, सार्वजनिक सुट्टी रद्द झाल्यास त्या दिवसाचा दुप्पट दराने अतिकालीक भत्ता देण्यात यावा व भरपाई सुट्टी देण्यात यावी. सदरचा भत्ता मंजूर करण्याबाबतचे अधिकार शाखा प्रमुखांना असावेत. | १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी सुरक्षा रक्षकाने काम केल्यास त्यांना कायद्यातील तरतुदी व नियमानुसार अतिकालीक भत्ता अदा करण्यात येतो तो पुढेही अदा करण्यात येईल. |
| ४ | विना तिकीट प्रवासी प्रवास करताना आढळल्यास सर्वस्वी प्रवासी जबाबदार धरण्यात यावा. | १९९६-२००० च्या कामगार करारातील कलम-१३९ मध्ये याबाबत प्रवाशाना दंड करण्याची तरतूद आहे. अशा प्रकरणी वाहकास शिस्त व अपिल कार्यपध्दतीखाली चौकशी करून प्रकरणपरत्वे कारवाई करण्यात येईल. |
| ५ | मोफत पास मिळण्यासाठी हजेरीचे बंधन घालण्यात येऊ नये. | मोफत पास मिळण्यासाठी हजेरीचे बंधन राहणार नाही. |
| ६ | महामंडळामार्फत नेमून दिलेल्या मुदतीत कर्मचा-यास पास न दिल्यास कर्मचारी पुन्हा मागणी केल्यानंतर पूर्ण कालावधीचा पास देण्यात यावा. | पासधारक कर्मचाऱ्याने पासाची मागणी केल्यानंतर प्रशासकीय अडचणीमुळे वा प्रशासनाने अन्य काही कारणामुळे नियमानुसार पात्र असूनही त्या कालावधीचा मोफत पास दिला नसेल तर अशा कर्मचाऱ्यांना सदरचा मोफत पास नंतर देण्यात येईल. |
| ७ | पास धारकाचे आई-वडिल / सासु -सासरे यांना त्याच कालावधीचे स्वतंत्र पास देण्यात यावेत. | कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांतील "कुटूंब" या व्याख्येमध्ये समाविष्ट असलेल्या व कर्मचा-यांवर अवलंबून असलेल्या कोणत्याही ६ व्यक्तींना वयाच्या अटीचे निर्बंध न घालता शासनाच्या कुटुंब नियोजन धोरणाच्या अधिन राहून मोफत पास देण्यात येईल. |

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| ८. | कोणत्याही पदामध्ये तात्पुरत्या बढतीवर सलग ३ वर्षे काम केलेल्या कर्मचा-याला त्या पदामध्ये नियमित बढती देण्यात यावी. | बढती देण्याच्या सध्याच्या नियम व तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.मात्र ज्या कर्मचाऱ्याला/ कामगाराला तात्पुरती बढती दिलेली आहे व सदर कर्मचारी केवळ सेवा निवृत्त होणार आहे म्हणून अशा कर्मचाऱ्याला अन्यथाकाही कारण नसेल तर सेवा निवृत्तीपूर्वी पदावनत ( Revert ) केले जाणार नाही. |
| ९ | वरिष्ठ लिपीक पदास वरिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक पदास वाहतूक पर्यवेक्षक असे संबोधण्यात यावे. | प्रशासन शाखेमध्ये काम करणा-या वरिष्ठ सहाय्यकास आस्थापना पर्यवेक्षक, वाहतूक शाखेमध्ये काम करणा-या वरिष्ठ सहाय्यकास वाहतूक पर्यवेक्षक असे संबोधण्यात येईल. मात्र त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये कोणताही बदल होणार नाही. |
| १० | मान्यताप्राप्त संघटनेला बैठकीसाठी महामंडळाच्या जागेत बैठक घेण्याची परवानगी मिळावी. | मान्यताप्राप्त संघटनेच्या बैठकीसाठी फक्त मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी येथील जागा (सभागृह) उपलब्धतेनुसार भाडे आकारुन देण्यात येईल. |
| ११ | अनुकंपा तत्वावरील कर्मचा-यांच्या पाल्यांना नोकरी देतांना अस्तित्वात असलेल्या जाचक अटी दूर कराव्यात. तसेच सर्वच पदावर शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरीत सामावून घ्यावे. | शैक्षणिक/शारिरीक पात्रतेनुसार अनुकंपा तत्वा वरील रिक्त पदे नियमानुसार भरली जातील. शारिरीक पात्रतेबाबत मुख्यत्वे उंचीबाबत प्रकरणपरत्वे शिथिलतेबाबत उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक निर्णय घेतील. |
| १२ | वैद्यकीय प्रतिपूर्ती बाबतची सर्व सुविधा व तरतूदी रा.प.महामंडळातील सर्व अंशकालीन अर्धवेळ कर्मचा-यांना देण्यात यावी. | रा.प.महामंडळातील दवाखान्यामध्ये उपलब्ध असलेली औषधे अंशकालीन व अर्धवेळ कर्मचा-यांना देण्याचा विचार करु. परंतु वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देता येणार नाही. |

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| १३ | संयुक्त विचार विनिमय बैठका अंतर्गत आगार / युनिट विभागीय व प्रादेशिक, मध्यवर्ती, विभागीय कार्यशाळा, मध्यवर्ती कार्यशाळा, इत्यादी पातळीवरील बैठका दरमहा घेण्यात याव्यात. | संयुक्त विचार विनिमय यंत्रणेखाली आगार पातळीवरील बैठका तीन महिन्यांऐवजी दोन महिन्यातून एकदा व राज्य पातळीवरील बैठका चार महिन्यांऐवजी तीन महिन्यातून एकदा घेण्यात येतील. |
| १४ | १)सहाय्यक,सहाय्यक कारागिर यांना निवडश्रेणी (Selection Grade) मंजूर करतांना घेण्यात येणारी व्यावसायीक चाचणी घेण्याची पध्दत बंद करावी.<br>२)निवडदर्जा (Gradation) मंजूर करतेवेळी चाचणी परिक्षा रद्द करावी व नियोजित कालावधी पूर्ण केल्यास तातडीने निवडदर्जा देण्यात यावा.<br>३)निवडदर्जा (Gradation) मंजूर करतेवेळी चाचणी परिक्षा (ट्रेड टेस्ट) उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांची बढती परिक्षेमधील चाचणी परिक्षा घेण्याची अट रद्द करुन त्या कर्मचा-याला बढती देण्यात यावी. | कार्यशाळा कर्मचा-यांना त्याच ट्रेडमध्ये निवडश्रेणी / निवडदर्जा देतांना सध्या असलेली चाचणीची अट रद्द करण्याचे मान्य करण्यात आले. मात्र बढतीसाठी चाचणी परिक्षा घेण्यात येईल. |
| १५ | चालक,वाहक हे कामगिरीवर जातांना स्वत:ची खाजगी रक्कम रु.१००/- पर्यन्त जवळ ठेवण्याची अट रद्द करावी. | सध्या चालक/वाहकांना कामगिरीवर जातांना स्वत:ची खाजगी रक्कम रु.१००/- जवळ ठेवण्याची मुभा आहे. दुहेरी रात्रवस्तीच्या कामगिरीवर जातांना स्वत:ची खाजगी रक्कम रु.२००/- पर्यन्त जवळ ठेवण्याची मुभा देण्यात येईल. |
| १६ | देश व विदेश पातळीवर असणा-या कामगार संघटनांच्या कामकाजा साठी मान्यताप्राप्त संघटनेच्या पदाधिका-यांना सहभागी होण्याकीरता कर्तव्यावर (ऑनडयूटी) असतांना सोडण्यात यावे. | वर्षातून एकदा मान्यताप्राप्त संघटनेच्या राज्य पातळीवरील अध्यक्ष व सरचिटणीस किंवा राज्य पातळीवरील दोन पदाधिकारी यांना देश पातळीवरील कामगार संघटनांच्या कॉन्फरन्ससाठी स्वखर्चाने प्रवासाचे दिवस धरून जास्तीत जास्त ५ दिवस ते कामगिरीवर उपस्थित आहेत असे समजण्यात येईल. |

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| १७ | सर्व साधारण | १.हा समझोता मान्यताप्राप्त संघटनेने सादर केलेल्या मागणी मसुद्यातील इतर मागण्याचे पूर्ण व अंतिम समाधान करणारा आहे असे मानण्यात येईल.<br>२.हा समझोता महामंडळाच्या मान्यतेच्या अधिन राहील.<br>३.या समझोत्याच्या अटीचा अर्थ लावण्या बाबत विवाद निर्माण झाला तर त्याबाबत महामंडळ संबंधीत पक्षकारांचे म्हणणे ऐकून निर्णय घेईल व महामंडळाचा निर्णय अंतिम असेल.<br>४.या समझोत्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ बाबत परिपत्रकीय सूचना प्रसारीत करण्यात येतील.<br>५.सदर समझोता, समझोत्यावर सहया केल्याच्या तारखेपासून अंमलात येईल.<br>६.या करारास शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही व ती पुर्ण करण्याची जबाबदारी शासन स्वीकारू शकत नाही .<br>७.हा समझोता दि.३१.३.२००८ पर्यंतच अस्तित्वात राहील. |

साक्षीदार

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासाठी व त्याच्यावतीने

(यु.एन. मोरे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

(ओम प्रकाश गुप्ता)
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

कामगारांच्या वतीने मान्यताप्राप्त संघटनेचे प्रतिनिधी

(शिवाजीराव चव्हाण)
अध्यक्ष,
महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना

(हनुमंत ताटे)
जनरल सेक्रेटरी,
महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना

ठिकाण- मुंबई
दिनांक - ३०.१०.२००७

## परिशिष्ट-अ

**खालील विषयावर कराराचा भाग समजून परिपत्रकीय सुचना काढण्यात येतील.**

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| १ | विभागीय कार्यालयातील प्रशासकीय कर्मचा-यांना नोकरभरती आणि करारानुसार वेतननिश्चिती इत्यादी कामासाठी अतिकालीक भत्ता देण्यात यावा व तो मंजूर करण्याचे अधिकार शाखा प्रमुखांना असावेत. | अतिकालीक भत्ता मंजूर करण्याचे अधिकार नियोजन खात्याचे परिपत्रक क्र.१२१४ दि.३१.१२.२००५ अन्वये विभाग नियंत्रक यांना दिलेले आहेत. |
| २ | रा.प.कर्मचारी कामगिरीवर असल्यास किंवा सेवेत असतांना अपघात झाल्यास अशा प्रसंगी अथवा ह्रदयविकाराचा झटका आल्यास वरील सर्व सवलती लागू कराव्यात. | रा.प.कर्मचारी अपघातामध्ये जखमी झाल्यास सेवा विनियम १९५ व १९६ खालील तरतुदीनुसार वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती केली जाते. आगार /घटक प्रमुख यांची परवानगी घेतली नाही म्हणून प्रतिपूर्ती नाकारली असल्याची उदाहरणे सादर केल्यास त्यांचे छाननी करून प्रकरणपरत्वे निर्णय घेण्यात येईल. |
| ३ | सध्याच्या रस्त्याची, मार्गावरील वाहनाची, अडथळ्याची, थांब्याची, वेळेची परिस्थिती घेऊन सर्व मार्गाची मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधी समवेत टेको मीटरच्या आधारे धाववेळेची फेर तपासणी करण्यात यावी व उभयपक्षी मान्य केलेली धाववेळ निश्चित करण्यात यावी. तसेच नवीन मार्गावर नियते सुरु करण्यापूर्वी वरील प्रमाणे पूर्तता करुनच नियत सुरु करावे. | १९९६-२००० च्या कामगार करारातील कलम-१४७(४) अन्वये चालू वेळेच्या (रनिंग टाईमच्या) बाबत निर्माण झालेल्या वादाच्या प्रकरणी आवश्यक सर्वेक्षण (सर्व्हे) स्थानिक व्यवस्थापनाकडून करण्यात येईल व त्यासाठी टेकोग्राफ बसविलेल्या वाहनांचा वापर केला जाईल, आणि त्याच्या निष्कर्षावर मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करण्यात येईल.तथापि, अंतिम निर्णय व्यवस्थापनाचा राहील व तो मान्यताप्राप्त संघटनेवर बंधनकारक राहील असे मान्य केलेले आहे. सदर तरतूदींची अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना प्रसारीत करण्यात येतील. |

| मागणी क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| ४ | १)फॉर्म-४ ची अंमलबजावणी करण्यापूर्वी किंवा नवीन वेळापत्रकाची अंमलबजावणी करण्यापूर्वी मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधी समवेत चर्चा करुन सहमती दिल्यासच सदरचे नवीन वेळापत्रक चालू करावे. जर सहमती दिली नाही तर असे नवीन वेळापत्रक चालू करु नये.<br>२)फॉर्म-४नियते,रा.प.बस,देखभाल चार्ट याची सुसंगत व सदर फॉर्म वर यंत्र अभियंता चालन, विभागीय वाहतूक अधिकारी व विभाग नियंत्रक यांच्या स्वाक्ष-या करुनच संघटना प्रतिनिधींना देण्यात यावे. त्यावर काही सूचना /आक्षेप असल्यास त्याचा पूर्ण विचार करुन त्या दुरुस्त करुन मान्य झाल्यास अंमलबजावणी करावी. | १९९६-२००० च्या कामगार करारातील कलम-१४७(१) मध्ये याबाबत तरतूद आहे व ती पुढे चालू राहील. तसेच कामगार कायद्यातील व करारातील तरतूदींचे उल्लंघन न करण्याबाबतच्या सूचना प्रसारीत करण्यात येतील. |
| ५ | चालकांना "क" व "ब" निवडश्रेणीची मंजूरी देण्याचे अधिकार विभाग नियंत्रक यांना देण्यात यावेत.( इतर विभागातून बदलून आलेल्या चालकांचे हजर दिवस त्यांचे रजा पुस्तकांवरुन घेण्यात यावेत. ) | चालकांना "क" व "ब" निवडश्रेणीची मंजूरी देण्याचे अधिकार नियोजन खात्याचे परिपत्रक क्र.१२१४ दि.३१.१२.२००५ अन्वये विभाग नियंत्रक यांना दिलेले आहेत. |
| ६ | मार्गस्थ बस मार्गावर पंक्चर झाल्यास टायरचे नुकसान झाल्यास रा.प. चालकास जबाबदार धरण्यात येऊ नयेत किंवा त्यांच्याकडून कोणतीही वसूली करण्यात येऊ नये. | मार्गस्थ बस मार्गावर पुढील टायर पंक्चर होऊन टायरचे नुकसान झाल्यास आणि तसे चौकशीअंती ते निष्पन्न झाल्यास चालकास जबाबदार धरले जाणार नाही. |
| ७ | कामगिरीवर असतांना कामगिरीसाठी येतांना व जातांना कोणत्याही स्वरुपाचा अपघात झाल्यास विनाअट अपघात रजा मंजूर करण्यात यावी. | कामगिरीवर असतांना अपघात झाल्यास संबंधीतांना श्रमिक नुकसान भरपाई कायदा,१९२३ अन्वये नुकसान भरपाई अदा केली जाते. अपघात प्रकरणी सेवा विनियम १०१ मधील तरतुदी प्रमाणे विशेष रजेबाबत कार्यवाही करण्यात येईल. |

| मागणी क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| ८ | मान्यताप्राप्त संघटनेबरोबर झालेल्या बैठकीच्या वृत्तांताचे टिप्पण बैठकीच्या वेळीच करण्यात यावे व त्या बैठकीनंतर घेण्यात आलेल्या निर्णयानंतर जे परिपत्रक तयार करण्यात येते ते संघटनेस विश्वासात घेऊन तयार करण्यात यावे व त्यानंतर सदरचे परिपत्रक प्रसारीत करण्यात येऊन त्याची प्रत संघटनेस देण्यात यावी. | मान्यताप्राप्त संघटनेबरोबर झालेल्या राज्यस्तरीय संयुक्त विचार विनिमय बैठकांचा चर्चेचा वृत्तांत विलंब न लावता काढला जाईल. तसेच घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रसारीत केलेल्या परिपत्रकाची एक प्रत मान्यताप्राप्त संघटनेच्या जनरल सेक्रेटरी यांना देण्यात येईल. |
| ९ | कार्यशाळा कर्मचा-यांना त्यांच्याकडे चालक परवाना आहे अशा कामगारांना वाहन चालन भत्ता देण्यात यावा व अशा कामगारांकडून अपघात झाल्यास चालक अपघाताप्रमाणे सर्व व्यवस्था रा.प. महामंडळाने करावी. | याबाबत सेवा विनियम मधील कलम क्र.१९५,१९६ मध्ये तरतूद आहे. तसेच कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.७/९७ मध्ये सविस्तर सूचना आहेत. |